

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

एप्रिल २०२४ | आवृत्ती-१०

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती



विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
१०० शताब्दी वर्ष
१९२३ - २०२३

एप्रिल २०२४ | आवृत्ती-१०

मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

# राष्ट्रसंतांचा राष्ट्रधर्म त्यांच्या तत्त्वज्ञानातून दिसून येतो

## जालना येथील ग्रामगीता प्रचारक श्री राजेंद्र वैद्य यांचे प्रतिपादन - विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त व्याख्यान




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा राष्ट्रधर्म त्यांच्या तत्त्वज्ञानातून दिसून येतो, असे प्रतिपादन जाफराबाद जालना येथील ग्रामगीता प्रचारक श्री. राजेंद्र वैद्य यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'राष्ट्रधर्म आणि संत तत्वज्ञान' या विषयावर मंगळवार, दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी व्याख्यान पार पडले. या व्याख्यानात श्री. वैद्य मार्गदर्शन करीत होते.

विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडलेल्या व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. यावेळी व्याख्याते म्हणून जालना येथील ग्रामगीता प्रचारक श्री राजेंद्र वैद्य तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे अकरावे पुष्प गुंफताना श्री वैद्य यांनी राष्ट्रसंतांच्या विचारांचे पत्र घेऊन आलो असून केवळ पोस्टमनचे कार्य बजावत असल्याचे सांगितले. महाराजांनी मानवतेचा पुरस्कार करणारे वाङःमय रचले. सर्व धर्मांचा आदर करीत सर्वांनी सामुदायिक प्रार्थना करण्याचा संदेश त्यांनी दिला. महाराजांनी त्यांची स्वतःची ओळख वाङ्मयातून दिली असल्याचे श्री वैद्य म्हणाले. देशासाठी जगा अथवा प्रसंगी मृत्यु पत्करा हा राष्ट्रसंतांचा राष्ट्रधर्म होता. सर्व पंथ, सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश त्यांनी सामुदायिक प्रार्थनेतून दिला आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी संतांनी सोप्या भाषेत कर्तुत्वाने साहित्याचा सारांश सांगितला असून संतांच्या साहित्यामध्ये राष्ट्रनिर्माणाचा पाया असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रसंत यांनी गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली सामुदायिक प्रार्थना सुरू केली. सामुदायिक प्रार्थना ही पूज्य विचार निर्माण करणारी असल्याचे ते म्हणाले. गावागावात असलेले गुरुदेव सेवा मंडळ आणि विद्यापीठ मिळून गावाच्या विकासासाठी रचनात्मक कार्य करू शकते. राष्ट्रसंतांच्या तत्वज्ञानाला प्रत्यक्षात उतरवू शकलो तर भरीव काम होईल, असे कुलगुरू म्हणाले. कार्यक्रमाला सर्व अभ्यास मंडळाचे अधिष्ठाता, शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक अधिकारी कर्मचारी, गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

## राष्ट्रसंतांच्या पुतळ्याला माल्यार्पण

विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्याला जयंती निमित्त विद्यापीठाच्या वतीने माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व व्याख्याते श्री. राजेंद्र वैद्य यांच्या शुभहस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराला प्रतिसाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त व्याख्यानानंतर जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सक्करदरा येथील श्री साईनाथ रक्तपेढीच्या पथकाने रक्तदान शिबिर आयोजित केले. रक्तपेढीच्या डॉ. सरस्वती, अनिल ढोणे, भावना वैद्य, सीमा तुरकर, माधुरी सिस्टर, रुपेश, अध्यासन केंद्रातील छाया खोब्रागडे, कल्याणी मेश्राम यांनी रक्तदान शिबिरास मदत केली. या शिबिराला विद्यापीठातील कर्मचारी तसेच गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभागी होत प्रतिसाद दिला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ,नागपूर

ई मासिक विद्यासंवाद

एप्रिल २०२४ | आवृत्ती-१०





## विद्यार्थ्यांनी कुंचल्यातून रेखाटले विविध भावविश्व

### विद्यापीठ ललित कला विभागात वार्षिक कला प्रदर्शन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात मंगळवार, १६ एप्रिल ते गुरुवार १८ एप्रिल २०२४ दरम्यान वार्षिक कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विभागातील विद्यार्थ्यांनी कुंचलातून विविध भावविश्व रेखाटले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित वार्षिक कला प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी मार्गदर्शन करताना कलाकार हा कलेचा साधक असतो, असे सांगितले.

वार्षिक कला प्रदर्शनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. दुधे यांनी कलाकार हा कलेसाठी समर्पण करतो. त्याला पैशाचा मोह नसतो. केवळ कलेची स्तुती हवी असते असे, सांगितले. वार्षिक कला प्रदर्शनामध्ये विभागातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या विविध असाइनमेंटच्या आधारे चित्र काढावे लागते. त्याचप्रकारे चित्र, चित्रण व छायाचित्र काढल्यानंतर त्याचे वार्षिक कला प्रदर्शन विभागाद्वारे भरविण्यात येते. विभागाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य प्राप्त होत असून त्यांच्या कलेला देखील मोठा वाव मिळतो. उद्‌घाटन या कार्यक्रमात प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी या उपक्रमाबाबत माहिती दिली. विभागातील वार्षिक कला प्रदर्शनामध्ये एकूण १०० चित्र, चित्रण व छायाचित्राचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.कार्यक्रमाचे संचालन विजय जथे यांनी केले तर आभार विवेक मिस्त्री यांनी मानले. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी विभागातील डॉ. अमोल गुल्हाने, डॉ. हरीश वाळके, डॉ. सदानंद चौधरी, डॉ. स्नेहल लिमये, प्रा. रुचिता अटाळकर, प्रा. मौक्तिक काटे, प्रा. मनोज चोपडे, प्रा. महेश मानकर, प्रा. हर्षद सालपे, प्रा. भाग्यलक्ष्मी देशकर, प्रा. प्राजक्ता चौधरी, प्रा. पूजा हिरवाडे, प्रा. नाना मिसाळ, प्रा. विकास जगदाळे, प्रा. राजश्री काटे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच संविधानातून मिळाला समानतेचा अधिकार

**संरक्षण मंत्रालयाचे उपमहाव्यवस्थापक श्री प्रणील डी. भगत यांचे प्रतिपादन**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती**





भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच संविधानाच्या माध्यमातून आपणास समानतेचा अधिकार मिळाला असल्याचे प्रतिपादन भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाचे उपमहाव्यवस्थापक श्री प्रणील डी. भगत यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात रविवार, दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी पार पडला. यावेळी 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' या विषयावर श्री. भगत मार्गदर्शन करीत होते.

विधी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते तर प्रमुख अतिथी

म्हणून संरक्षण मंत्रालयाचे उपमहाव्यवस्थापक श्री प्रणील भगत, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, उपप्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांची उपस्थिती होती. तत्पूर्वी महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी माल्यार्पण केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, व्याख्याते श्री प्रणील भगत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कोणत्याही समाजाला प्रगतिशील पाहायचे असेल तर महिलांनी समोर येणे आवश्यक आहे. महिलांना समान हक्क देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वात मोठे योगदान आहे. संत कबीर म्हणतात कोणत्याही महान व्यक्तीला जाती एवजी ज्ञान किती आहे हे विचारणे आवश्यक आहे. महिला, बालक, गरीब तसेच मागासवर्गीय जातीच्या लोकांना समानतेचा अधिकार मिळत नाही, तोपर्यंत तो समाज उन्नती करू शकत नाही. आज महिला, दलित समाजातील लोक सर्व लोकांसोबत खांद्याला खांदा मिळवून चालत आहे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीच देन असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना डॉ. सुभाष चौधरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान सभेतील संघर्षाबाबत माहिती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक असामान्य व्यक्तीमत्त्व होते.त्यांना विविध विषयांचा खोलवर अभ्यास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले तरी आपल्याला ऊर्जा प्राप्त होते, असे डॉ. सुभाष चौधरी यांनी सांगितले. आज आपणास शांतता, समता, न्यायचे स्वातंत्र्य मिळाले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी मानले.





## विद्यापीठांच्या आंतरराष्ट्रीयकरणातून ज्ञानासह संस्कृतीचे आदान प्रदान

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे यांचे प्रतिपादन

### विद्यापीठात 'भारतीय पारंपारिक विद्यापीठांचे आंतरराष्ट्रीयकरण कसे करावे' या विषयावर व्याख्यान

विद्यापीठांचे आंतरराष्ट्रीयकरण झाल्यास ज्ञान तसेच तेथील संस्कृतीचे आदान-प्रदान होते. शिवाय संबंधित देशातील सामाजिक-आर्थिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सामंजस्यातून समाधान शोधण्याचा प्रयत्न देखील होतो, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (आयक्यूएसी) वतीने गणित विभागातील श्रीनिवास रामानुजन हॉल येथे मंगळवार दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी आयोजित व्याख्यानात 'भारतीय पारंपारिक विद्यापीठांचे आंतरराष्ट्रीयकरणाकडे दिशादर्शक वाटचाल' या विषयावर डॉ. विजय खरे मार्गदर्शन करीत होते.

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह यांनी कार्यक्रमाची अध्यक्षता केली. व्याख्याते म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. दुसऱ्या देशातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेण्यास गेल्यास दोन्ही देशातील ज्ञान, संस्कृती, संसाधनांचा उपयोग याचे आदान प्रदान होत असल्याचे पुढे बोलताना डॉ. खरे यांनी सांगितले. विद्यापीठांचे आंतरराष्ट्रीयकरण करीत विद्यार्थी, शिक्षकांचे शैक्षणिक आदान-प्रदान करणे हा एक साधा सोपा मुत्सद्दीपणा आहे. वर्तमान काळामध्ये दोन देशांमध्ये शैक्षणिक सामंजस्य करार, संयुक्त पब्लिकेशन, संशोधन याची गरज त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय भाषण करताना नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह यांनी पारंपारिक विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीयकरण करणे का गरजेचे आहे त्याचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक यांची उपस्थिती होती.

# "कीर्ती" चाचणीसाठी पहाटेच गाठले खेळाडूंनी मैदान निवड चाचणीच्या प्रक्रियेस प्रारंभ






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने 'कीर्ती' उपक्रमातंर्गत क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंत खेळाडू निवड चाचणीस मंगळवार, दिनांक २३ एप्रिल २०२४ पासून प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या रवि नगरातील क्रीडांगणावर खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून आयोजित असलेल्या निवड चाचणीसाठी पहाटे पासूनच खेळाडूंनी मैदान गाठले. पहिल्याच दिवशी विविध भागातील तब्बल ३५० खेळाडूंनी ॲथलेटिक्सच्या निवड चाचणीसाठी सहभाग नोंदविला.

विद्यापीठ खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून कीर्ती उपक्रम अंतर्गत आयोजित निवड चाचणीची सुरुवात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, माजी संचालक डॉ. धनंजय वेळूकर आणि भारतीय खेळ प्राधिकरणाच्या निरीक्षक भावना सुतार यांच्यासह समितीतील सदस्य डॉ. आदित्य सोनी, डॉ. मनोज आंबटकर, डॉ. विवेकानंद सिंग, डॉ. नितीन जंगिटवार, डॉ. अमित टेंभूर्णे, डॉ. सुधीर सहारे, डॉ भरत मेहता, सायली वाघमारे, अर्चना कोट्टेवार, गणेश वाणी, नितीन धाबेकर यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी २०३६ मधील ऑलम्पिक स्पर्धेच्या दृष्टीने खेळाडू तयार व्हावेत म्हणून या निवड चाचणीचे आयोजन केल्याचे सांगितले. ऑलिंपिक स्पर्धेसाठी भारत सरकारच्या क्रीडा व युवक मंत्रालयाच्या प्रतिभावंत खेळाडू शोध मोहिमेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला सहभागी होण्याची संधी मिळाल्याने आनंद होत असल्याचे ते म्हणाले. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत निवड न झालेल्या खेळाडूंना देखील विद्यापीठाच्या विविध केंद्रामध्ये दत्तक घेतले जाईल. पालकांमध्ये देखील जागृती कार्यक्रम राबविले जाणार असल्याचे असे डॉ. दुधे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अर्चना कोट्टेवार यांनी केले. या निवड चाचणी दरम्यान डॉ. पिनाक दंदे यांच्या रुग्णालयाकडून वैद्यकीय सहायता प्राप्त होत आहे.

## ॲथलेटिक्सच्या निवड चाचणीने सुरुवात

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला कीर्ती उपक्रम अंतर्गत ५ क्रीडा प्रकाराची मान्यता मिळाली आहे. कोणत्याही जिल्ह्यातील ९ ते १८ वयोगटातील मुले व मुली या निवडचाचणीत सहभागी होऊ शकतात. पहिल्याच दिवशी ॲथलेटिक्स खेळ प्रकारातील रनिंग, थ्रोईंग व जम्पिंगची चाचणी खेळाडूंनी दिली. सुरुवातीला फिजिकल फिटनेस चाचणी घेण्यात आली. त्यानंतर ६० मी. स्प्रिंग, बॉल थ्रो, शॉर्टपूट (स्टँडिंग), ६०० मी. धावणे, लांब उडी व उंच उडी आदी प्रकारासाठी मुले व मुलींची निवड चाचणी घेण्यात आली. ॲथलेटिक्स खेळ प्रकारात नागपूरसह, वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा मध्य प्रदेशातील शिवनी, छिंदवाडा आदी परिसरातील खेळाडू सहभागी झाले होते.




## 'कबड्डी' साठी १४२ खेळाडू उतरले मैदानात
## कीर्ती चाचणीत दुसऱ्या दिवशीही खेळाडूंमध्ये उत्साह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने 'कीर्ती' उपक्रम अंतर्गत क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंत कबड्डी खेळाडूंची शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी बुधवार, दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ६ वाजता घेण्यात आली. विद्यापीठाच्या रविनगरातील क्रीडांगणावर खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून आयोजित असलेल्या निवड चाचणीसाठी दुसऱ्या दिवशी देखील खेळाडूंमध्ये उत्साह दिसून आला. दुसऱ्या दिवशी विविध भागातील १४२ कबड्डीपटूंनी निवड चाचणीसाठी सहभाग नोंदविला.

ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता बनविण्याचे लक्ष्य ठेवून स्थानीय पातळीवर प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्यासाठी भारत सरकारच्या युवा आणि खेळ मंत्रालयाने पुढाकार घेतला आहे. भारतीय खेळ प्राधिकरणाच्या मदतीने देशभरातून ऑलिंपिक पदकांचे स्वप्न पाहणाऱ्या आणि ते पूर्ण करण्याची क्षमता असणाऱ्या खेळाडूंची आधुनिक काळातील तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय बेंच मार्क वापरून क्रीडा प्रतिभेचा शोध घेण्यासाठी कीर्ती या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून कीर्ती उपक्रम अंतर्गत दुसऱ्या दिवशी कबड्डी या खेळातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करण्यासाठी शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी घेण्यात आली. या चाचणीकरिता नागपूरसह चिमूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, बुलढाणा आदी शहरांसह गुजरात राज्यातील देखील विद्यार्थी सहभागी झाले होते. कीर्ती उपक्रम अंतर्गत सुरू असलेल्या शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी दरम्यान अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त खेळाडू श्री विजय मुनीश्वर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संजय चौधरी यांनी भेट दिली. यावेळी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, माजी संचालक डॉ. धनंजय वेळूकर, भारतीय खेळ प्राधिकरणाच्या निरीक्षक भावना सुतार, समितीतील सदस्य डॉ. आदित्य सोनी, डॉ. मनोज आंबटकर, डॉ. विवेकानंद सिंग, डॉ. नितीन जंगिटवार, डॉ. अमित टेंभूर्णे, डॉ. सुधीर सहारे, डॉ भरत मेहता, सायली वाघमारे, अर्चना कोट्टेवार, गणेश वाणी, नितीन धाबेकर यांची उपस्थिती होती.




## १७० खेळाडूंनी दिली खो-खो साठी चाचणी
## कीर्ती चाचणीला तिसऱ्या दिवशीही प्रतिसाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने 'कीर्ती' उपक्रम अंतर्गत क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंत खो-खो खेळाडूंची शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी गुरुवार, दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ६.३० वाजता घेण्यात आली. विद्यापीठाच्या रविनगरातील क्रीडांगणावर खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून आयोजित असलेल्या निवड चाचणीसाठी तिसऱ्या दिवशी दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला. विविध परिसरातील १७० खो-खो पटूंनी निवड चाचणीसाठी सहभाग नोंदविला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून कीर्ती उपक्रम अंतर्गत तिसऱ्या दिवशी खो-खो या खेळातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करण्यासाठी शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी घेण्यात आली. या चाचणीकरिता १११ मुले व ५९ मुली अशा एकूण १७० खेळाडूंनी सहभाग घेतला. या चाचणीकरिता नागपूरसह, वर्धा, चंद्रपूर, वरोरा, भंडारा, सावनेर, काटोल, बालाघाट (मध्य प्रदेश), खापरखेडा आदी शहरातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

कीर्ती उपक्रम अंतर्गत सुरू असलेल्या शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी दरम्यान विदर्भ खो-खो संघटनेचे सचिव सुधीर निंबाळकर यांनी भेट दिली. यावेळी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, माजी संचालक डॉ. धनंजय वेळूकर, भारतीय खेळ प्राधिकरणाच्या निरीक्षक भावना सुतार, समितीतील सदस्य डॉ. आदित्य सोनी, डॉ. मनोज आंबटकर, डॉ. विवेकानंद सिंग, डॉ. नितीन जंगिटवार, डॉ. अमित टेंभूर्णे, डॉ. सुधीर सहारे, डॉ भरत मेहता, सायली वाघमारे, अर्चना कोट्टेवार, गणेश वाणी, नितीन धाबेकर यांची उपस्थिती होती.





## व्हॉलीबॉल खेळासाठी १५५ खेळाडूंनी दिली चाचणी
### कीर्ती' उपक्रम अंतर्गत क्रीडा चाचणी



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने 'कीर्ती' उपक्रम अंतर्गत क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंत व्हॉलीबॉल खेळाडूंची शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी शुक्रवार, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ६.३० वाजता घेण्यात आली. विद्यापीठाच्या रविनगरातील क्रीडांगणावर खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून आयोजित असलेल्या निवड चाचणीसाठी चौथ्या दिवशी दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला. विविध परिसरातील १५५ व्हॉलीबॉल पटूंनी निवड चाचणीसाठी सहभाग नोंदविला. यामध्ये ९३ मुले तर ६२ मुलींचा समावेश होता.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून कीर्ती उपक्रम अंतर्गत चौथ्या दिवशी व्हॉलीबॉल या खेळातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करण्यासाठी शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी घेण्यात आली. व्हॉलीबॉल करिता १२ वर्ष वया खालील ६ मुले, २ मुली, १५ वर्ष वयाखालील ३५ मुले, ४७ मुली, १८ वर्ष वयाखालील ५२ मुले व १३ मुली असे ९३ मुले व ६२ मुली एकूण १५५ खेळाडूंनी निवड चाचणी दिली. या चाचणीकरिता नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, छिंदवाडा, बालाघाट, भोपाल (मध्य प्रदेश) आदी शहरातील विद्यार्थी सहभागी झाले होते. एनएसआयएस प्रशिक्षक डॉ. अशोक कापटा यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्ती उपक्रम अंतर्गत सुरू असलेल्या

व्हॉलीबॉल खेळ प्रकाराकरीता शारीरिक क्षमता आणि कौशल्य चाचणी झाली. यावेळी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, माजी संचालक डॉ. धनंजय वेळूकर, भारतीय खेळ प्राधिकरणाच्या निरीक्षक भावना सुतार, समितीतील सदस्य डॉ. आदित्य सोनी, डॉ. मनोज आंबटकर, डॉ. विवेकानंद सिंग, डॉ. नितीन जंगिटवार, डॉ. अमित टेंभूर्णे, डॉ. सुधीर सहारे, डॉ भरत मेहता, सायली वाघमारे, अर्चना कोट्टेवार, गणेश वाणी, नितीन धाबेकर यांची उपस्थिती होती.






# 'कीर्ती' अंतर्गत फुटबॉलसाठी ७४४ खेळाडूंची चाचणी

## माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या उपस्थितीत निवड चाचणीचा समारोप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने 'कीर्ती' उपक्रमातंर्गत फुटबॉल (मुले-मुली) क्रीडा प्रकारात प्रतिभावंत खेळाडू निवड चाचणीत तब्बल ७४४ विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाले. विद्यापीठाच्या रविनगरातील क्रीडांगणावर खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून आयोजित असलेल्या निवड चाचणीचा समारोप राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या उपस्थितीत शनिवार, दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी समारोप झाला.

विद्यापीठ खेलो इंडिया केंद्राच्या माध्यमातून कीर्ती उपक्रम अंतर्गत आयोजित निवड चाचणी मंगळवार, दिनांक २३ एप्रिल ते २७ एप्रिल २०२४ दरम्यान घेण्यात आली. शनिवारी फुटबॉल खेळ प्रकारात ६८४ मुले तर २०० मुली अशा एकूण ८८४ खेळाडूंनी कीर्ती उपक्रम अंतर्गत निवड चाचणीत सभाग घेतला. निवड चाचणीच्या अंतिम दिवशी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी क्रीडा मैदानावर भेट देत सहभागी खेळाडूंचा उत्साह द्विगुणीत केला. यावेळी डॉ. चौधरी यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, भारतीय खेळ प्राधिकरणाच्या निरीक्षक भावना सुतार, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कारार्थी श्रीविजय मुनीश्वर, विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ संजय चौधरी, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक मंडळाचे सदस्य डॉ. नितीन जंगिटवार, सदस्य डॉ. आदित्य सोनी, अभिनव बिंद्रा फाउंडेशनचे श्री शैलेश लांबे आदी उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला कीर्ती उपक्रम अंतर्गत ५ क्रीडा प्रकाराची मान्यता मिळाली आहे. कोणत्याही जिल्ह्यातील ९ ते १८ वयोगटातील मुले व मुली या निवडचाचणीत सहभागी होऊ शकतात. डॉ. इंद्रजीत बसू व अतुल नेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली फुटबॉल खेळाची निवड चाचणी घेण्यात आली. सदस्य डॉ. मनोज आंबटकर, डॉ. विवेकानंद सिंग, अर्चना कोट्टेवार यांनी चाचणीचे संचालन केले या निवड चाचणी दरम्यान डॉ. पिनाक दंदे यांच्या रुग्णालयाकडून वैद्यकीय सहायता प्राप्त झाली.








## कीर्ती उपक्रमातंर्गत निवड चाचणी














## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महात्मा ज्योतिबा फुले जयंती




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनात गुरुवार,दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या कार्यक्रमात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे कुलसचिव डॉ. राजू हिवसे वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी आंतरविद्या शाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




# मतदानात नागपूर डिस्टिंक्शनने होणार पास
# जनजागृती कार्यक्रमात युवा मतदारांचा निर्धार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुढाकाराने 'मिशन युवा व मिशन डिस्टिंक्शन' कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मतदानात डिस्टिंक्शनने पास होणार असा निर्धार युवा मतदारांनी 'मिशन युवा व मिशन डिस्टिंक्शन' या जनजागृती कार्यक्रमात व्यक्त केला. सभागृहात उपस्थित हजारो युवक-युवतींनी त्यांच्या मोबाईलचे फ्लॅश लाईट सुरु करीत जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद दिला. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता माननीय भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांन्वये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, जिल्हा निवडणूक कार्यालय व नागपूर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन युवा व मिशन डिस्टिंक्शन' अंतर्गत नव मतदार आणि मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या हेतूने हा जनजागृती प्रचार- प्रसार कार्यक्रम कविवर्य सुरेश भट सभागृह येथे शुक्रवार दिनांक ५ एप्रिल २०२४ रोजी घेण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी (S श्रीमती सौम्या शर्मा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, श्री अजय चव्हाण, श्री वामनराव तुर्के डॉ. देवेंद्र भोंगाडे नागपूर महापालिकेचे उपायुक्त मिलिंद मेश्राम, रंजना लाडे, सहाय्यक आयुक्त महेश धामेचा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य श्री दिनेश शेराम, श्री प्रथमेश फुलेकर श्री सुनील फुडके, डॉ. किशोर इंगळे. डॉ. महेंद्र ढोरे डॉ. नितीन कोंगरे, विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यार्थी विकास संचालक डॉ. मंगेश पाठक, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, मनपाचे क्रीडा व सांस्कृतिक अधिकारी पियुष अंबुलकर प्राचार्य डॉ. रविशंकर मोर महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी श्री मनीष सोनी यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी आयोजित उपक्रम सुवर्ण अक्षरात लिहिण्याचा दिवस असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी मार्गदर्शन करताना मिशन डिस्टिंक्शन हा मोठा उत्सव आपण साजरा करीत असल्याचे सांगितले. या महा उत्सवात सहभागी झालेल्या तरुणाईचे त्यांनी स्वागत केले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा यांनी मार्गदर्शन करताना स्वतः मतदान करीत तसेच कुटुंबीयांना व परिसरातील नागरिकांना मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याबाबत जागरूक करण्याचे आवाहन त्यांनी केले. मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी व्हिडिओद्वारे संदेश देत महापालिका क्षेत्रातील नागरिकांना मतदान करण्याकरिता योग्य त्या सुविधा दिल्या जात असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड यांनी केले तर आभार मनपा उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमात जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या वतीने मतदान जनजागृती बाबत तयार करण्यात आलेले व्हिडिओ दाखविण्यात आले. कार्यक्रमाला प्राचार्य, शिक्षक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नेहा ढबाले हिने दिली मतदानाची शपथ**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची राष्ट्रीय खेळाडू नेहा ढबाले हिने कविवर्य सुरेश भट सभागृहात उपस्थित हजारो विद्यार्थ्यांना मतदान करण्याबाबत शपथ दिली. या सोबतच जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी केलेल्या आवाहनाला विद्यार्थ्यांनी त्यांच्या मोबाईलचे फ्लॅश लाईट सुरु करून प्रतिसाद दिला.



## मराठी विभागातर्फे विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाला अभ्यास भेट

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागातर्फे शनिवार दिनांक ६ एप्रिल २०२४ रोजी नागपूर येथील 'विदर्भ साहित्य संघा'च्या ग्रंथालयाला शैक्षणिक अभ्यास भेट देण्यात आली. ह्या भेटीदरम्यान विदर्भ साहित्य संघा'च्या ग्रंथालयातील ग्रंथपाल माधुरी वाडीभस्मे यांनी ग्रंथालयाचा इतिहास व तेथील प्रशासकीय कामकाज यांची माहिती दिली.

सुप्रसिद्ध निवेदक प्रकाश एदलाबादकर यांनी विदर्भ साहित्य संघा'चा इतिहास त्यांची आजपर्यंतची वाटचाल व विविध साहित्यिक उपक्रम ह्याविषयी माहिती सांगितली. ह्या अभ्यास भेटीला 'विदर्भ साहित्य संघा'चे अध्यक्ष प्रदीप दाते हे उपस्थित होते. त्यांनी मानवी जीवनातील ग्रंथाचे महत्व आणि वाङ्मयीन संशोधनाची आवड वृद्धिंगत व्हावी असे प्रतिपादन केले. दिवसेंदिवस फोफावत चाललेल्या इंटरनेट व समाज माध्यमाच्या आभासी दुनियेत आपलं भान जाग ठेवण्याची ताकद फक्त ग्रंथातच आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी 'विदर्भ साहित्य संघा'च सांस्कृतिक व साहित्यिक योगदान पटवून दिले. दिवसभर चाललेल्या ह्या भेटीत विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाची पाहणी केली, तेथील ग्रंथालयीन व्यवहार तपासून पहिले. तसेच विदर्भ साहित्य संघाच्या इतर विभागालासुद्धा भेटी दिल्या. ह्या उपक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते सुप्रसिद्ध निवेदक प्रकाश एदलाबादकर ग्रंथपाल माधुरी वाडीभस्मे मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे विभागातील इतर प्राध्यापक व एम. ए. भाग एक व दोनचे विद्यार्थी उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांनी घेतली लोकसभा सचिवालयाची माहिती

### पदव्युत्तर विधी विभागातील विद्यार्थ्यांचा दिल्ली येथे अभ्यास दौरा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विधी विभागातील विद्यार्थ्यांचा दिल्ली येथे शैक्षणिक अभ्यास दौरा शनिवार, दिनांक ६ एप्रिल २०२४ रोजी पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी लोकसभा सचिवालय, नवीन संसद भवन, विधानसभा आणि संसद भवन ग्रंथालयाला भेट देत माहिती घेतली.

पदव्युत्तर शैक्षणिक विधी विभागातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या दिल्ली येथील अभ्यास दौऱ्या दरम्यान लोकसभा सचिवालयाचे संचालक श्री पि.के. मलिक यांच्याशी संवाद साधला. श्री मलिक यांनी विद्यार्थ्यांना संसदेचे कामकाज कशा प्रकारे चालते याबाबत माहिती दिली. आगमनानंतर विद्यार्थ्यांना सोबतच लोकसभा सचिवालय, भारतीय संसदेचा इतिहास, वास्तुकला आणि महत्त्व याविषयी सर्वसमावेशक विस्तृत माहिती श्री मलिक यांनी दिली. विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे मुंदाफळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्राध्यापक पद्मा चौबे, दिपाली मानकर, रिचा कोचर आणि शिवानी खंडाते यांच्या सह एलएलएमच्या ३० विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग होता. लोकशाही आणि शासनाच्या तत्त्वांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती झाली आणि कायदेशीर तसेच राजकीय प्रणालींबद्दल त्यांचा दृष्टीकोन विस्तृत झाला.







## भारताला घडविण्यासाठी एनईपी आवश्यक - उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर

### स्कूल कनेक्ट २ संपर्क अभियान कार्यशाळा-

### स्कूल कनेक्टच्या दुसऱ्या टप्प्याची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठापासून सुरुवात






नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनिवार्य असून शंभर टक्के लागू होणार आहे. नवीन पिढी अर्थात भारताला घडविण्यासाठी एनईपी आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत स्कूल कनेक्ट २ संपर्क अभियान कार्यशाळा गुरुनानक भवन येथे सोमवार, दिनांक ८ एप्रिल २०२४ रोजी पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. देवळणकर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठापासून स्कूल कनेक्ट टप्पा २ ची सुरुवात करीत असल्याचे सांगितले.

`कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, लिटूचे संचालक डॉ. राजू मानकर, नागपूर विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांची उपस्थिती होती. शैक्षणिक क्षेत्रातील बदलाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. बारावीची परीक्षा झाली असून त्या विद्यार्थ्यांना एनईपीबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात स्कूल कनेक्ट हे अभियान राबविले जात असल्याचे डॉ. देवळणकर यांनी पुढे मार्गदर्शन करताना सांगितले. बारावीनंतर ४० टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणात येतात. उर्वरित पदवी, अन्य अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. पारंपरिक अभ्यासक्रमाबाबत अनास्था असल्याने काही विद्यार्थी प्रवेशच घेत नसतील. उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची रचना बदलली आहे हे सांगण्यासाठी अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यास आता कौशल्य, आवडीचे शिक्षण, मेजर- मायनर, ऑन जॉब ट्रेनिंग, विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. एनईपीत रोजगाराभिमुख शिक्षण मिळणार असून विद्यार्थ्यांना हे सांगणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. २०२३-२४ या शैक्षणिक क्षेत्रात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम असलेल्या विद्यापीठांचे स्वायत्त विभाग, स्वायत्त महाविद्यालय तसेच पीजी असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर एनईपी लागू करण्यात आली. २०२४-२५ या शैक्षणिक क्षेत्रापासून संपूर्ण राज्यात पदवी अभ्यासक्रमांना एनईपी लागू होईल. त्यामुळे अशा अभिमुकता कार्यशाळांची गरज त्यांनी व्यक्त केली. उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचे एकूण नोंदणी प्रमाण ३४.९ टक्केच असून हे प्रमाण ५० टक्के करावयाचे असल्याने संपूर्ण राज्यात अभियान राबविले जात आहे. एनईपीबाबत सर्वांना माहिती व्हावी म्हणून कार्यबल गट, त्यानंतर ४ समित्या, सुकाणू समिती स्थापन करण्यात आली. प्रत्येक महिन्याला बैठकी होत असल्याने राज्यात एनईपी यशस्वीपणे राबविले जात आहे. शासन, विद्यापीठ तसेच महाविद्यालय नवीन शैक्षणिक राष्ट्रीय धोरण लागू करण्यासाठी टीमवर्क करीत आहे. महाराष्ट्राच्या या मॉडेलचे दिल्लीत कौतुक होत असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्याने अनेक पायंडे निर्माण केले आहे. नॅक मूल्यांकनाबाबत महाराष्ट्र देशात अव्वल आहे. एनईपीचे स्वागत करण्यासाठी राज्य तयार आहे यामध्ये मातृभाषेतून शिक्षण, स्वातंत्र्य व लवचिकता असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणांना संपत्ती म्हणून तयार करण्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आवश्यक असून पुढील काळ शिक्षकांसाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय नैतिक कर्तव्य म्हणून याकडे बघा तसेच संपूर्ण देशात महाराष्ट्राचे आदर्श मॉडेल तयार करा, असे डॉ. देवळणकर म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी बारावीतील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे, असे सांगितले. उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचे एकूण नोंदणी प्रमाण २० टक्क्याने कमी होत आहे. त्यामुळे विद्यापीठांमधून कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे तसेच त्याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. स्कूल कनेक्ट कार्यक्रमांमध्ये माध्यमिक शिक्षण विभागाला देखील सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक करताना प्र-कलगुरु डॉ. दुधे यांनी विद्यापीठ परिक्षेत्रात स्कूल कनेक्ट १ अभियान कशाप्रकारे राबविले याची माहिती दिली. नागपूर वर्धा भंडारा व गोंदिया जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. एनईपी अंतर्गत अभ्यासक्रम आराखडा अंतिम झाला असून विद्यार्थी पालकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी स्कूल कनेक्ट कार्यक्रम राबविला जात असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता प्राचार्य शिक्षक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# डॉ. सुभाष चौधरी यांनी कुलगुरु पदाचा पूर्ववत कार्यभार सांभाळला







## विविध समाज घटकांकडून कुलगुरूंचे स्वागत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा डॉ. सुभाष चौधरी यांनी पूर्ववत कार्यभार गुरुवार, दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० वाजता सांभाळला. कुलगुरू पदाचा कार्यभार पूर्ववत स्वीकारल्यानंतर संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयीन व्यवस्थापनाचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, यांच्यासह विविध सामाजिक संघटना तसेच समाज घटकांकडून डॉ. सुभाष चौधरी यांचे उस्फुर्त स्वागत करण्यात आले.

कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात स्वागत समारंभ आणि शुभेच्छा पर्व पार पडले. यावेळी मनोगत व्यक्त करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक विकासाबाबत माहिती दिली. शैक्षणिक क्षेत्रात विविध पदावर कार्य केले असल्यामुळे महाविद्यालयीन स्तरावर विकासासाठी कोणत्या अडचणी येतात याची जाणीव होती. त्याचा फायदा विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयीन तसेच स्वायत्त विभागांच्या विकासात योग्य रितीने होत आहे. कुलगुरू झाल्यानंतर महाविद्यालये तसेच विभागांचा योग्य विकास करण्याकरिता धोरण तयार केले. संपूर्ण महाराष्ट्रात अभियांत्रिकी शाखेला सर्वप्रथम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण लागू केले. सोबतच अनेक बाबी प्रथमच करण्यात आल्या. समाजाचा सामाजिक-आर्थिक विकास कसा होईल, या दृष्टीने कार्यक्रम निश्चित करण्यात आले. विविध पायाभूत सुविधा उभारण्याचे कार्य सुरू केले. विद्यापीठात मोठ्या प्रमाणात संशोधन होते. त्याचा समाजाकरिता अधिक प्रमाणात उपयोग व्हावा म्हणून विविध उपाय योजना करण्यात आल्या. स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून विकासाच्या दृष्टीने 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियानाची सुरुवात करण्यात आली, असे डॉ. चौधरी यांनी स्वागत समारंभाला उत्तर देताना सांगितले. सर्वांच्या सहकार्याने हे साध्य करता आले आणि पुढेही सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे असे डॉ. चौधरी म्हणाले.





माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी पूर्ववत कार्यभार सांभाळल्यानंतर त्यांचे स्वागत करताना व्हीआयटीचे संचालक डॉ. चंद्रहास हांडा त्यांना कोणत्याही ओळखीची गरज नसल्याचे सांगितले. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. चौधरी यांचे संघर्षमय जीवन असून संघर्ष हेच आमचे काम असल्याचे डॉ. हांडा म्हणाले. माजी विभाग प्रमुख डॉ. गोवर्धन खेडेकर यांनी मनोगत व्यक्त करताना विविध कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन कुलगुरू डॉ. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली केल्याचे सांगितले. ध्येयाने पुढे जात काम कसे करावे. कमल पुढे कसे जायचे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉ. चौधरी असल्याचे ते म्हणाले. गुरुदेव सेवा मंडळाचे श्री ज्ञानेश्वर रक्षक यांनी मार्गदर्शन करताना डॉ. चौधरी यांच्या नेतृत्व गुणांची प्रशंसा केली. यांच्यासह कर्मयोगी फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पंकज ठाकरे, बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे, प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. अभय शेंडे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे श्री. चंद्रशेखर शेळके, श्री. भिवगडे यांनी देखील मनोगत व्यक्त करताना डॉ. चौधरी यांच्याबाबत गौरवोद्गार काढले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक, ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, शताब्दी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे श्री. ज्ञानेश्वर रक्षक, माजी विभाग प्रमुख डॉ. गोवर्धन खेडकर, कर्मयोगी फाउंडेशनचे श्री. पंकज ठाकरे, व्हीआयटीचे संचालक डॉ. चंद्रहास हांडा, बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे, प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. अभय शेंडे यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख, विविध विभागांचे उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, अधिकारी, कर्मचारी, विद्यापीठ विविध कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते, मराठा सेवा संघ, ओबीसी महासंघ आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी यांच्यासह ५०० पेक्षा अधिक नागरिकांची उपस्थिती होती.



## 'यशासाठी जीवनविद्येची जीवन कौशल्ये" अभ्यासक्रमास उस्फूर्त प्रतिसाद विद्यापीठ औषधी निर्माणशास्त्र विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'यशासाठी जीवनविद्येची जीवन कौशल्ये' अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला. या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाने मान्यता दिलेल्या या अभ्यासक्रमाला १०० हुन अधिक विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसला.

जीवनाच्या विविध पैलूंमध्ये यश मिळवण्यासाठी आवश्यक जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांना सुसज्ज करण्याच्या उद्देशाने या अभ्यासक्रमाचे

आयोजन करण्यात आले. जीवनविद्या मिशन मुंबई आणि नागपूर येथील विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शनाद्वारे सहभागींनी त्यांची वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढ होण्यासाठी तयार केलेल्या सर्वसमावेशक अभ्यासक्रमाचा लाभ घेतला.

औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद बी. खेडेकर यांच्या तज्ज्ञ समन्वयाखाली डॉ. प्रकाश इटनकर आणि प्रा. दादासाहेब कोकरे यांच्या अथक परिश्रमाने हा अभ्यासक्रम भरभराटीला आला. श्री. योगेश पी. निकम यांनी विद्यार्थ्यांच्या समन्वयाची जबाबदारी चोखपणे पार पाडली व अभ्यासक्रम सुरळीत पार पडला. शनिवार आणि रविवार असे ०३ आठवडे एकूण ३६ तासांचे लेक्चर्स (३२ तास प्रत्यक्ष व्याख्याने आणि ०४ तास ऑनलाईन लेक्चर्स) आयोजित करण्यात आले होते. जीवनविद्या मिशन मुंबई चे तज्ज्ञ वक्ते डॉ. दिलीप पटवर्धन (एमएस नेत्रविज्ञान), श्री बंसीधर राणे (माजी डेप्युटी जनरल, भारत बिजली लि), श्री विनोद मालुसरे (मार्केट रिसर्च अँड डेटा अनालिसिस लीडर), डॉ. प्रकाश इटनकर (प्राध्यापक, औषधीनिर्माणशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ), श्रीमती माणिक पळसकर (उमंग प्रकल्प प्रभारी, महान ट्रस्ट मेळघाट), डॉ. योगेश किटे (एमडी होमिओपॅथी, व्यसनमुक्ती तज्ज्ञ), श्री मनीष शिंदे (स्ट्रॅटेजिक बिझनेस लीडर), कु. स्नेहल दळवी (वरिष्ठ सल्लागार, ग्रेट प्लेस टू वर्क), कु. प्रीती कोंडकर (व्यवस्थापक, इंटरनॅशनल टॉय कंपनी), श्री दशरथ शिरसाठ (यशस्वी व्यावसायिक उद्योजक), श्री गौरव दामले (संचालक, सिव्हिल ग्लोब कन्सल्टन्ट प्रायव्हेट लि.) या अनुभवी वक्त्यांनी प्रख्यात तत्वज्ञ, विचारवंत श्री वामनराव पै यांनी मांडलेल्या जीवनकौशल्यांच्या तत्वांचे शिक्षण श्री प्रल्हाद वामनराव पै यांच्या योग्य मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. या अभ्यासक्रमात प्रामुख्याने निसर्ग नियम आणि मानवी जीवन, शरीर साक्षात परमेश्वर , वैश्विक जीवनमूल्ये, व्यक्तिमत्व विकास, मनाचे सामर्थ्य, यशाची गुरुकिल्ली,सत्संग व सुसंवाद, तणावाचे आनंदशास्त्र, निर्णयक्षमता, आयुष्यातील प्राथमिकता इत्यादी विषयांचा समावेश होता.







## महिला राष्ट्रीय विद्यार्थी संसदेत सर्वोत्कृष्ट अध्यक्ष म्हणून खुशाली दलालची निवड

### विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाला बहुमान

भारतीय विश्वविद्यालय संघ यांच्या वतीने आयोजित दुसऱ्या महिला राष्ट्रीय विद्यार्थी संसदेत सर्वोत्कृष्ट अध्यक्ष म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी खुशाली दलाल हिची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट अध्यक्ष म्हणून निवड झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाला बहुमान प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात बीए एलएलबी ५ वर्षीय अभ्यासक्रमात सहाव्या सेमिस्टरची खुशाली जयंत दलाल ही विद्यार्थिनी आहे. भारतीय विश्वविद्यालय संघ व पारुल विद्यापीठ वडोदरा गुजरात यांच्या वतीने द्वितीय महिला राष्ट्रीय विद्यार्थी संसदेचे आयोजन ९ एप्रिल ११ एप्रिल २०२४ दरम्यान करण्यात आले. संपूर्ण भारतातील ३५ विद्यापीठांमधून १५० पेक्षा अधिक स्पर्धक या संसदेमध्ये सहभागी झाले होते. एकूण चार फेऱ्यांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. पहिल्या फेरीत "महिला आरक्षण विधेयक" या विषयावर चर्चा झाली. दुसऱ्या फेरीत "नवीन शैक्षणिक धोरण (NEP)" या विषयावर चर्चा झाली आणि तिसऱ्या फेरीत "डिजिटल" या विषयावर चर्चा झाली. या तीनही चर्चेमध्ये विधी महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेतला. मात्र, 'वैयक्तिक डेटा संरक्षण" या विषयावरील चर्चेसाठी संघ चौथ्या फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही. चौथी फेरी म्हणजेच अंतिम फेरी होती. सर्व फेऱ्यांमध्ये कठीण प्रश्न आणि उत्तर विभागांमध्ये स्पर्धा केल्यानंतर खुशाली जयंत दलाल यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. "टी हाऊसचे सर्वोत्कृष्ट अध्यक्ष" (वैयक्तिक पुरस्कार) हा किताब पटकावला. या यशाबद्दल विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, उपप्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी खुशालीचे अभिनंदन केले आहे.





# उत्तम खेळाडू निर्मितीत महत्त्वपूर्ण प्रशिक्षण केंद्र म्हणून विद्यापीठाने कार्य करावे

## भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पद्मश्री पी. टी. उषा यांचे विचार-विद्यापीठातील क्रीडाविषयक उपक्रमांची घेतलेली माहिती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरातील सिंथेटिक ट्रॅकचा परिपूर्ण उपयोग करून उत्तम खेळाडू निर्माण करावे. त्याचप्रमाणे देशातील एक महत्त्वाचे प्रशिक्षण केंद्र म्हणून विद्यापीठाने कार्य करावे, असे विचार भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पद्मश्री पी. टी. उषा यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या विविध क्रीडाविषयक उपक्रमांची माहिती देण्यासाठी आणि भारतीय खेळ प्राधिकरणाच्या प्रशिक्षण केंद्र विस्तारा संदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी व क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे वरिष्ठ सदस्य डॉ. धनंजय वेळुकर यांनी चंद्रपूर येथे प्रवासात असताना पी. टी. उषा यांची भेट घेतली.

भारतीय खेळ प्राधिकरणाने आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय भारत सरकारच्या वतीने विद्यापीठाचे २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धांसाठी खेळाडू निवडीसाठी टॅलेंट सर्च "कीर्ती" या कार्यक्रमासाठी निवड केली आहे, अशी माहिती डॉ. शरद सूर्यवंशी यांनी पी. टी. उषा यांना दिली. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर यांनी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकचा उपयोग ॲथलेटिक्स खेळाचे एक्सलेन्स सेंटर म्हणून करण्यास्तव यासाठीचा प्रस्ताव आम्ही केंद्र शासनाकडे पाठवीत आहोत, या संदर्भातली माहिती दिली. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या विशेष प्रयत्नांनी विद्यापीठाच्या इंडोर स्टेडियमसाठी ४४.४४ कोटी रुपयाचा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध झालेला आहे. यामध्ये असलेल्या विविध क्रीडाविषयक सुविधा बाबत डॉ. शरद सूर्यवंशी यांनी पी. टी. उषा यांनी माहिती दिली. त्यावर पी. टी. उषा यांनी या स्टेडियमचा उपयोग नियमित सरावासाठी खेळाडूंना व्हावा. स्पर्धात्मक उपयोगितेपेक्षा सरावासाठीच्या उपयोगिता विद्यापीठात निर्माण व्हाव्यात. त्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ करीत असलेल्या प्रयत्नांसाठी, पी. टी. उषा यांनी समाधान व्यक्त केले. विद्यापीठाच्या वतीने आर्थिक दुर्बल घटकांच्या खेळाडूंना देण्यात येणारी आर्थिक मदती, विशेषत: भटक्या विमुक्त आणि घूमंतू जनजातीच्या खेळाडूंसाठी तसेच शाळाबाह्य मुला-मुलीसाठी सामाजिक दायित्वातून करत असलेल्या मदतीबद्दल पी. टी. उषा यांनी विद्यापीठाची प्रशंसा केली.




# हेक्झावेअरच्या प्राथमिक चाचणीत ३५ जणांची निवड

## रोजगार व प्रशिक्षण विभागाचा प्लेसमेंट ड्राईव्ह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये हेक्झावेअर टेक्नॉलॉजीस कंपनीने प्राथमिक चाचणीत ३५ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. मुलाखतीनंतर अंतिम विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. विद्यापीठाच्या महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृह येथे हेक्झावेअर टेक्नॉलॉजीस कंपनीचा प्लेसमेंट ड्राईव्ह मंगळवार दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी पार पडला.

हेक्झावेअर टेक्नॉलॉजीस ही कंपनी जागतिक तंत्रज्ञान आणि वाणिज्य प्रक्रिया क्षेत्रात सेवा देणारी कंपनी आहे. १९ विविध देशांमध्ये या कंपनीचे कार्यालय आहेत. या कंपनीकडून कस्टमर सपोर्ट एक्झिक्यूटिव्ह आणि इंटरनॅशनल प्रोसेस या पदाकरिता या मुलाखतीचे आयोजन केले होते. कंपनीकडून आयोजित करण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये एकूण १७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली तर प्रत्यक्ष ७० विद्यार्थी मुलाखत प्रक्रियेला उपस्थित होते. दीक्षांत सभागृह येथे आयोजित रोजगार मेळाव्या प्रसंगी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती. कंपनीच्या वतीने सुरुची डंभारे, तयबा खान, पूजा पवार यांच्याकडून प्राथमिक चाचणी निवड प्रक्रिया राबविण्यात आली. प्राथमिक निवड चाचणीत उत्तीर्ण झालेल्या ३५ विद्यार्थ्यांमधून मुलाखतीनंतर अंतिम विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.





# संधी न सोडत स्वतःवर विश्वास ठेवल्याने मिळते यश

## आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त श्री रवींद्र ठाकरे यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

## विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्रात विद्यार्थ्यांशी साधला संवाद

एकही संधी न सोडता स्वतःवर विश्वास ठेवल्याने स्पर्धा परीक्षेत यश मिळते, असा कानमंत्र विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त श्री रवींद्र ठाकरे यांनी दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. व्ही. बी. कोलते ज्ञानस्त्रोत केंद्र येथे जागतिक पुस्तक दिवसाच्या निमित्ताने मंगळवार, दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात श्री. ठाकरे मार्गदर्शन करीत होते.

ज्ञानस्त्रोत केंद्र येथील वाचन कक्षात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी भूषविले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त श्री रवींद्र ठाकरे, विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. विजय खंडाळ, आदिवासी विकास विभागाचे उपायुक्त श्री. दशरथ कुळमेथे, सहाय्यक आयुक्त नयन कांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना स्पर्धा परीक्षेची तयारी कशा प्रकारे करावी याबाबत डॉ. रवींद्र ठाकरे यांनी ज्ञानस्त्रोत केंद्रात अभ्यासाकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती दिली. स्पर्धा परीक्षेत हमखास यशाची गॅरंटी कोणीच देऊ शकत नाही. मी देखील एमपीएससी परीक्षा चौथ्या प्रयत्नात उत्तीर्ण केली. अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून शिक्षण कार्य करीत असताना स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये अभ्यास करावा लागत असे. कोणत्या विषयांची निवड करावी. याची पुरेपूर माहिती देखील नव्हती. पहिल्या परीक्षेत भौतिकशास्त्र विषय घेतला. त्यानंतर लोकप्रशासन विषय निवडत वाचन सुरू केले. विषयाच्या वाचनासह अवांतर वाचन देखील सुरू होते यामध्ये त्यावेळी स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेले विविध मासिके, सीबीएसई, एनसीईआरटीची पुस्तके वाचून काढली. लोकप्रशासन हा नवीन विषय असल्याने त्यातील सर्व संकल्पना समजून घेतल्या. दिल्ली येथे क्लासेसला गेलो नाही. मात्र, सेल्फ स्टडी करीत संबंधित विषयाच्या नोट्स तयार करीत अभ्यास केला. स्पर्धा परीक्षेच्या तयारीला गांभीर्याने घेण्याचे आवाहन त्यांनी केले. अधिकाधिक तास अभ्यास करा. परिश्रम केल्याने मृत्यू होत नाही, जिंकण्याची जिद्द पाहिजे, नैराश्य शब्दाला आपल्या कक्ष बाहेर काढा, अधिकाधिक चांगला प्रयत्न करा. प्रयत्न करणे तुमच्या हातात आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, नियोजन करा, कोणती पुस्तके वाचायची याबाबत निश्चित करा, मध्येच रस्ता सोडू नका अशा टिप्स देखील त्यांनी यावेळी दिल्या.

अध्यक्षीय भाषण करताना आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'वाचाल तर वाचाल' हा संदेश विद्यार्थ्यांना दिला. वाचनामुळेच माणसाला ज्ञान प्राप्त होते. वाचन असेल तरच जीवनाचे सार्थक होईल. त्यामुळे वाचनाची आवड निर्माण करा असे डॉ. कडू म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत आभार ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी मानले. कार्यक्रमाला ज्ञानस्त्रोत केंद्रातील सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पूजा दाढे, श्री. सुरेश रंधई यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



# स्वदेशी साहित्यातून एलईडी लाइट्स निर्मिती शक्य

## भौतिकशास्त्र विभागात एलईडी लाइट्स निर्मितीचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

